## नियमित दिवाणी दावा क्र.२५/२०२२ मधील अर्ज (नि.क्र.२६) वरील आदेश

वादीतर्फे दाखल अर्ज (नि.क्र.२६), प्रतिज्ञापत्र (नि.क्र.२७), वादीतर्फे दाखल म्हणणे वाचले. वादी व वादीतर्फे विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले. कागदपत्रे तपासली.

२. वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेशिका २६ नियम ९ नुसार मोजणी होणेसाठी दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार, मौजे कुरवली बु. येथील घर क्र. ४४ व ४४/१ या मिळकतीचे दक्षिणेस प्रतिवादींनी वादीचे हरकतीस न जुमानता पाया खोदुन घराचे बांधकाम सुरु केले व ते त्यांनी करु नये म्हणून वादीने प्रतिवादींविरुद्ध ताकीदीचा दावा दाखल केला आहे. दरम्यानचे काळात मनाई न मिळालेने प्रतिवादींनी वादीचे घराचे दक्षिण बाजूस सिमेंटचे खांब उभे केलेने व पत्र्याचे शेड टाकलेने वादीस घराचे दक्षिण बाजूने त्याचे गोबर गॅसकडे व नेहमीचे मित्याची कामे करणे अवघड झाले आहे. असे असताना प्रतिवादींनी वादीचे हरकतीस न जुमानता घराचे बांधकाम केले असलेने तेथे वादीचे घराचे दक्षिण बाजूने वादीस गॅसची टाकीकडे व जाणेयेणेचे जागेवर सिमेंटची जाळी वगैरे लावली आहे किंवा कसे तसेच प्रतिवादीने घराचे बांधकाम करुन वादीची जाणेयेणेची कशी कोंडी केली आहे याची प्रत्यक्ष पाहणी करुन त्याचा सविस्तर अहवाल मे. कोर्टासमोर येणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे आहे. करीता कोर्ट कमिशनची नेमणुक करणेत यावी, अशी विनंती केली आहे.

३. सदरकामी प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन वादीच्या अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा व बनावट असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी यांचे म्हणणेनुसार, वादीने केवळ मे. कोर्टामार्फत पुरावा गोळा करण्याचे दुष्ट हेतुने कोर्ट कमिशन नेमणुकीचा अर्ज दाखल केला आहे. सबब, वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांतर्फे युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीने सदरचा दावा हा दावा मिळकतीचे दक्षिण बाजूने सिमेंट विटांचे पक्के बांधकाम करु नये व सिमेंटचे पोल उभे

करुन कुंपण करु नये म्हणून निरंतर ताकीदीचा अर्ज दाखल केलेला आहे. दाव्या सोबत वादीने तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल केला होता. परंतु, प्रतिवादीने बांधकाम केले असल्याने ताकीद अर्ज चालविला नाही. त्या अनुषंगाने वादीने नि.क्र.२६ लगत कोर्ट कमिशनचा अर्ज दाखल करुन प्रतिवादीने वादीचे दक्षिण बाजूस सिमेंटची जाळी लावली आहे असे कथन केले आहे. तसेच, वादीस येण्याजाण्याची कोंडी देखील केली आहे असे कथन असले तरी प्रतिवादीने त्यास आक्षेप नोंदविला आहे. अशा परिस्थितीत वादीच्या कथनाप्रमाणे कोर्ट कमिशन करुन प्रतिवादीने वादीस हरकत व अडथळा केला आहे किंवा कसे ही बाब न्यायालयासमोर येण्यास मदत होणार आहे व न्यायनिर्णय करण्यास देखील उपयुक्त ठरणार आहे. त्या अनुषंगाने वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज (नि.क्र.२६) मंजूर करण्यात येतो.

२. ॲड.यु.व्ही.कदम यांनी अर्ज (नि.क्र.२६) मध्ये नमुद केल्याप्रमाणे मौजे कुरवली बु., ता.फलटण येथील घर क्र. ४४ व ४४/१ या मिळकतीचे दक्षिण बाजूची प्रत्यक्ष पाहणी करुन नकाशादर्शक वस्तुस्थितीजन्य अहवाल एक महिन्याच्या मुदतीत सादर करावा.

३. वादीने रु.२,०००/- कमिशन शुल्क जमा करावे.

४. येणेप्रमाणे कमिशनपत्र काढावे.

सही/-

फलटण. (श्रीमती के.आर.पाटील.)

दिनांक- ११.०३.२०२५ ६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण.